म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. २४८९



REFBK-0024002
REFBK-0024002

# श्रावणमय

माधुरी दीक्षित

24002
9319083

# श्रावणमय

माधुरी दीक्षित

REFBK-0024002
REFBK-0024002

पारिजात

प्रकाशक :

पारिजात पब्लिकेशन्स्,
ब्लॉक नं ३,
५७६, शिवाजीनगर,
जंगली महाराज रस्ता,
पुणे ४११००४,
दूरध्वनी ५२८८१

© प्रा. सुधीर हुद्देदार

प्रथमावृत्ती :
मार्च १९८३

मांडणी : के. विजय अबाडे

मुखपृष्ठ : अनिल उपळेकर

ब्लॉक/छपाई : व्ही. जोशी, ब्लॉक मेकर्स

मूल्य : आठ रुपये

मुद्रक :
एस्. आर. अग्रवाल,
ज्ञानसरिता मुद्रणालय,
८/११, एरंडवणे,
पुणे ४११००४

---

या पुस्तकाच्या प्रकाशनार्थ महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाच्या नवलेखक अनुदान योजनेखाली अनुदान मिळालेले आहे.

मला कवितेचा वारसा देणाऱ्या

नि माझ्यातला कवितेचा कोवळा हिरवा अंकुर

हळुवारपणे जोपासणाऱ्या

सौ. आई व वडील ती. भाऊ

—यांना मनःपूर्वक अर्पण...

**पूर्वप्रसिद्धी–**

पारिजात

आदिम

दिंडी

जुई

लोकमत

# प्रस्तावना

मी हे जे काही लिहिते आहे, ती रूढ अर्थाने प्रस्तावना नव्हे. वाङमयाच्या क्षेत्रात अनुभवाने आणि ज्ञानाने तप आचरणाऱ्या माणसांनी, त्या पुस्तकाच्या निमित्ताने संबंधित विषयाला किंवा कला-प्रकाराला दिलेलं योगदान म्हणजे प्रस्तावना, अशी प्रस्तावनेची संकल्पना माझ्या मनात आहे. त्या अर्थाने ही प्रस्तावना नाही.

हे आहे थोडंसं मुक्त लिहिणं. आपल्या पिढीच्या कविता वाचता वाचता जे जाणवलं, ते लिहिणं. जवळपास माझ्याच वयाच्या या तरुण कवयित्रीनं लिहिलेल्या कवितांचा आस्वाद घेताना जे मनात आलं, ते कवितेवरच्या प्रेमातून शब्दबद्ध करणं.

माधुरी दीक्षितचा हा पहिलावहिला काव्यसंग्रह ! वयाच्या पंच-विशीच्या आतल्या या कविता आहेत. आयुष्यात हे वयच असं असतं,की जेव्हा आपण जवळजवळ सगळेच कवी असतो. हे वय विश्वास ठेवण्याचं असतं. प्रेम करण्याचं असतं. स्वतःला मुक्त झोकून देण्याचं न् बंधनं तोडण्याचं असतं. जीव लावण्याचं आणि जीवन हवंसं वाटण्याचं असतं. या वयातल्या झुंजीही विलक्षण, आणि जखमाही विलक्षण असतात.स्वप्नांना सत्याचे पंख लावू पाहण्याची जिद्द असते या वयात.

—आणि मग स्वप्नं असतात, म्हणून कविता असते. जीवन — मग भले ते केवढंही क्रूर असो, त्याला झोंबणं असतं, म्हणून कविता असते. सत्याला भिडण्याची ताकद असते, म्हणून कविता असते. तुम्हांला. नकळत कवितेची वाट तुमच्या पायांत उलगडत असते.

पण ह्या सुरुवातीच्या उलगडण्यावर अनेकदा आपण थांबतो. खूश होतो. कविता सापडलीशी वाटते. पण ते खरं नसतं. कविता फार साधी आहे. आणि तशी ती साधी असल्यामुळेच, आपण चकतो. ती सहजासहजी सापडत नाही. जाणीवपूर्वक तिला धुंडाळणं हे त्यानंतर सुरू होतं.

माधुरीच्या कवितांबाबत मला प्रथम जाणवलं, ते हे, की कवितेच्या वाटेवर असं जाणिवेनं चालण्याचं भान तिला आलं आहे. एका उग्रसुंदर अन् शक्तिशाली प्रदेशातल्या वातावरणाची केवळ एक पुसट झलक आपल्या मनात वादळ उठवून गेली आहे अन् खरा आकांत तर पुढेच आहे, याची जाणीव या कवितेला आहे. म्हणून तर 'चाहूल' या कवितेत माधुरी म्हणते :

एक मुलगी हरवली आहे
तिला एवढाच निरोप द्या, की
उन्हाळ्याची चाहूल लागायला लागलीय्
आणि कविता तुझी, केव्हाची वाट पाहतीय्'

कवितेचा उन्हाळा माधुरीला अजून अनुभवायचा आहे. या कविता अजून तरी हिरव्या आहेत. पाऊसप्रहरांच्या आणि वसंतबहराच्या आहेत. पूर्णतः रोमँटिक आहेत. निर्भरशील, फुलपाखरांच्या जातकुळीतल्या आहेत. त्यांची वृत्ती मुळातच बहिर्मुख नाही. समूहमनाच्या जाणिवा व्यक्त करण्याची नाही. स्वतःतच नादवण्याचा त्यांचा स्वभाव आहे. मला महत्त्वाची गोष्ट वाटते, ती ही, की माधुरीनं कुठेही आपल्या प्रवृत्तीविरुद्ध जाण्याचा अट्टाहास या संग्रहात केलेला दिसत नाही.

अलीकडे, नव्याने लिहू लागलेल्या आमच्या पिढीतल्या अनेकांचे कवितासंग्रह वाचताना कविमनाचा एक प्रकारचा गोंधळ जाणवतो. आज समूहाचं जगणं अधिक प्रभावी होत चाललं आहे. समूहमनाचा व्यक्तिमनावरचा प्रभाव प्रचंड वाढतो आहे. जीवनाला भिडताना, अनुभवाला सामोरं जाताना अंतर्मनातून एकाच वेळी स्वतःचा आणि समूहाचा आवाज ऐकू येतो आणि कवी गोंधळून जातो. व्यक्तिभान आणि समूहभान यांचा नेमका मेळ घालता येणं शक्य होत नाही. आपण आणि आपल्या मनातलं समूहाचं अस्तित्व यांचे स्वच्छ अर्थ आणि स्वरूप लक्षात येत नाही आणि मग कविता ना धड व्यक्तिमनाचं प्रत्ययकारी दर्शन घडवतात, ना समूहमनाचं—अशीही अवस्था होते. अशा ओढाताणीत सापडलेल्या मनांच्या कितीतरी कविता आज भोवती विखुरलेल्या दिसतील. कधी बळजबरीनं समूहमन व्यक्त करण्यात ओढल्या गेलेल्या, म्हणून उथळ, मनःपूर्वकताशून्य कविता,

तर कधी प्रयत्नानं समूहापासून तुटलेल्या, म्हणून सुटच्या चमकदार कल्पनांसारख्या आणि संवादाची शक्तीच हरवून बसलेल्या कविता !

यात स्वतःच्या संवेदना सगळयाच पातळयांवरच्या जगण्यासाठी कायम जाग्या ठेवणं आणि त्यांवर येणारी फोलपटं सतत दूर करित, स्वतःला आणि स्वतःत अटळपणे असलेल्या समूहाला प्रामाणिक उद्गार देत जाणं आवश्यक आहे. माधुरीच्या कवितेनं एवढी गोष्ट सांभाळली आहे, की जी वाट तिला तिची वाटली नाही, ती तिनं कोणत्याही मोहानं धरली नाही. तिचा स्वप्नाळूपणा, तिचं शब्दवेड, तिच्या स्वच्छंदी कल्पना या तिच्याच आहेत.

प्रेम आणि निसर्ग या दोन केन्द्रांभोवती माधुरीच्या कवितांचा आशय फिरतो. अर्थात या दोहोंबद्दलच्या माधुरीच्या जाणिवा रोमँटिक आहेत. प्रेमाचे सगळे रागरंग, सूक्ष्म तरंग माधुरी संवेदनशीलतेनं टिपते आणि निसर्गाच्या मनात रुजलेल्या रूपांमधे त्यांना मिसळून टाकते. या मिसळणीतून या संग्रहातल्या सगळयाच कवितांना एक लोभस स्वप्नांसारखं रूप आलं आहे.

मानवी भावना-वासनांचा खोलवरचा तळ तपासून पाहायला अजून सुरुवात झालेली नाही. त्यांच्या हिंस्र दर्शनानं अजून मन अस्ताव्यस्त झालेलं नाही. मानवी व्यवहाराच्या गूढ डोहाचं झपाटलेपण अजून पुरतं परिचयाचं व्हायचं आहे. कोणत्याच जीवघेण्या ताणांनी, आंतर-द्वंद्वांनी अजून या कवितेच्या प्राणभूत आशयाला अस्वस्थ केलेलं नाही. ते जे निर्दय, क्रूरकठोर वास्तव आहे, ते तर अजून समोर यायचं आहे. या साऱ्यापासून स्वप्नांच्या इंद्रधनूसारख्या रंगीत कोषात या कवितांनी स्वतःला जपलं आहे.

> मीच होते इथे तिथे अन्
> अल्याडाच्या पार पलिकडे
> कुठेच नव्हती तुझी सावली
> फक्त होते स्वप्नकेवडे ।

अशा अवस्थेतल्या या हिरव्याकच्च्या कविता आहेत; नव्या पालवीच्या कविता आहेत.

म्हणून या कवितांमधे सगळ्या नव्या नवलाईच्या खुणा आहेत. शब्दांचं तेच लाघवी वेड, प्रतिमारूप येण्यापूर्वीचे भावस्थितीचे विविध

आकार, कल्पनांची तीच मधुर ओढ आणि रचनेच्या रुळवलेल्या आवडत्या मोजक्या वाटा! अजून आविष्काररूपं पक्की व्हायची आहेत. अजून गरजेशिवायच्या कल्पनांचे मोह टळायचे आहेत. शब्दांचं लावण्य भावलं आहे; पण शक्ती भावायची आहे. अजून ही कवयित्री कवितेकडे बाळडोळयांनी पाहते आहे.

पण हे पाहणंही आश्वासक आहे. कारण श्रावणसयीत भान हरपून गेलेली ही कविता उन्हाळयाचं उंबरठ्याशी रेंगाळणं विसरलेली नाही. त्याच्याही स्वागताला ती सिद्ध आहे. कवितेतला बहराचा ऋतू तिनं ज्या उत्कटतेनं अंगावर घेतला, त्याच उत्कटतेनं आता कवितेतला ग्रीष्मही तिनं अनुभवावा.

ऑस्कर वाइल्डनं म्हटलं आहे :

'जोपर्यंत सागरात नाव बुडाल्यानंतर तडफडणाऱ्या माणसासारखी तुमची स्थिती होत नाही, तोपर्यंत तुम्ही काही करणार नाही.'

ही तडफडीची अवस्था व्हावी, यासाठी एकमेकांना जागं करणं, ही कलाक्षेत्रातल्या मैत्रीची अट आहे, असं मी मानते. या कवितांसंबंधी हे सगळं लिहिताना मी तीच अट पुरी करीत आहे.

**अरुणा ढेरे**

७७ शनिवार पेठ, पुणे ३०

## श्रावणाच्या आठवणींत बुडण्यापूर्वी, थोडेसे...

आली श्रावणाची सय
अशी आभाळ भरून
चिंब ओल्या अक्षरांनी
भिजू आले तन मन.

'श्रावणसय' हा माझा पहिलाच कवितासंग्रह. कितीतरी वर्षे मनात तुडुंबलेलं श्रावणाचं सावळं आकाश असं कवितांच्या सरींतून बरसलं नि शब्द कसे मोकळे, घननीळ झाले. असा पावसाचा उत्सव जो डोळयांनी पाहिला, अनुभवला, तोच कागदावर अक्षरांनी चितारला.

अर्थात ही किमया अशी माझी एकटीची नव्हेच. अनेक पाऊसवेडेही यात सामील झाले. माझ्या बरोबरीने श्रावणाच्या रंगगंधात बुडाले. माझे पती प्रा. सुधीर हुद्दार—ज्यांनी ही कविता उत्कटतेने जपली, माझे गुरू श्री रमेश कुकडे—ज्यांनी माझ्या कवितांचं अमाप कौतुक केलं नि उत्तेजन दिलं, माझे एक हितचिंतक श्री. गोपाळ मिरीकर, ज्यांनी माझ्यातली कवयित्री सतत जागती ठेवली नि कवितांचं स्वागत केलं, जिवाभावाची मैत्रीण वासंती देशपांडे—माझं कवितेचं मन जिनं हळुवारपणे नेहमीच फुलवत ठेवलं, अशी कितीतरी नावं. ओळखीची नि अनोळखी सुद्धा. माझे कविमित्र श्रीधर अंभोरे, विलास गिते, चंद्रकांत पालवे यांचाही इथे आवर्जून उल्लेख केला पाहिजे. या 'श्रावणसयी'साठी पारिजातकाचा गंधही हळूच दरवळत इथे तिथे घुमला. हा कवितासंग्रह ज्यांनी प्रसिद्ध केला, ते 'पारिजात' प्रकाशनचे के. विजय अंबाडे—कवितासंग्रह सुंदर आणि कलात्मकपूर्ण कसा होईल, ह्याच्याकडें अगदी जातीने लक्ष देणारे. याचे श्रेय त्यांना द्यायला हवेच. तसेच चित्रकार श्री. अनिल उपळेंकर ह्यांनी 'श्रावणसयी'चे भाव, कुंचल्यातून हुबेहूब टिपले, याबद्दल त्यांना धन्यवाद द्यावे तेवढे थोडेच.

नवोदित ही पायरी ओलांडून कवितेच्या क्षेत्रात स्वतःचं असं अस्तित्व निर्माण करणाऱ्या अरुणा ढ़ेरे हिनं माझ्या कवितांना प्रस्तावना किंवा तिच्याच भाषेत थोडसं मुक्त लिहिणं अगदी आनंदानं

कबूल केलं,यातच कलाक्षेत्रातल्या मैत्रीची अट खरोखरीच पुरी झाली, असं मी म्हणते.

सुप्रसिद्ध कवयित्री अनुराधा पोतदार यांनीही माझ्या कवितांना जी दाद दिली, त्यामुळे मनात नकळत उत्साह अंकुरत गेला नि म्हणूनच 'श्रावणसय' अशी दिशा–दिशांत उमलून आली.

माझ्या कवितासंग्रहाला अनुदान देणाऱ्या 'महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती अनुदान मंडळा'चीही मी ऋणी आहे.

तर अशा लक्ष लक्ष ओंजळींत जपलेली 'श्रावणसय' सर्वांनाच सुखावून जाईल, हीच ओली जाणीव मनात !

सौ. माधुरी हुद्देदार

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२४८८
दा. क्र. २४००२
काव्य
१३।१९८३
संद. शाखा (स्थळ प्रत)

## सौदागर

एक स्वप्नांचा सौदागर
हिंडतो आहे दशदिशांतून
अंकुरलेल्या स्वप्नांची विक्री करत
तो भंगलेली स्वप्नेंही विकत घेतो, म्हणे !

एकदा माझी सगळी वठलेली स्वप्ने
मी त्याला विकणार आहे.
कारण ती आता बहरणार नाहीत,
हे मला माहीत आहे

पण तो सौदागर स्वप्नांचा बाजार मांडून
कुठल्या चंद्रप्रकाशात बसला आहे ?
युगानयुग मी त्याची वाट पाहते;
पण त्याचा ठावठिकाणाच नाही.

## सय

डोळयांत का दाटलेला
धूसरसा अश्रुपूर
गर्द रानात हरवले
स्वप्न–पक्ष्याचे हे सूर...

कशी थांबता थांबेना
झाडांची ही पानगळ
पुनवेच्या चंद्राला या
नाही लागली चाहूल...

कुण्या सख्याची, ग, सय
दाटली या हृदयात
स्वप्न–पक्ष्याची ती लय
उतरली या ओठांत...!

□

## खेळ

तुझी आठवण
जसे मऊ मोरपीस
निळ्या जांभळ्या रंगांनी
विणलेले क्षणकोष...

तुझी आठवण
माझ्या गीताच्या, रे, ओळी
सारवल्या अंगणात
शुभ्र चांदणी रांगोळी

तुझी आठवण
स्वप्न हिरव्या रानाचे
विसकटल्या पानांत
सूर लाजऱ्या पक्ष्याचे...

तुझी आठवण
खेळ माझ्याच मनाचा
नाही काहीच, रे, खरे
सगळा डावच खोटयाचा...!

□

## अबोल वचन

किती कितीक सवयी
आज तुझ्या आठवती
आले भरूनही डोळे
श्वास ओठांत थांबती...

गीत फितुरल्या वेळा
क्षण काटेरी ओळींचे
तुझे शब्दही झेलता
झाड पेलले फुलांचे...

ओल्याच पंखांनी
आज पाखरे उडाली
कशा मी सजवू ?
त्यांच्या नादावल्या झुली...

तुझे अबोल वचन
सांग, कुठे विसरले ?
हळव्या मनातही
लाख दीप उजळले...

□

## रावा

देहभान हरपून
स्वर बोटांत रुतले
गर्द तांबड्या रेघेची
खूण उठवून गेले ।

जुळलेल्या तारांची
अशी सतारीची मिठी
गात्र गात्र कंपनांचे
पीस उमटले ओठी ।

माझे आवडीचे गीत
दूर वाऱ्यात घुमले
पडसाद त्याचेही
माझ्या दारी आले ।

तरंगल्या ओळींच्या
मी हाकारल्या नावा
पुसटल्या क्षणांचा
कुठे घुमलासे रावा ?

□

## आता

चांदणीला स्पर्श कळला नाही आभाळाचा
आभाळाने काय करावे ?
त्याला नाही कळली व्यथा चांदणीची
तिने काय करावे ? ...

कथा आभाळाची, व्यथा चांदणीची
झाकाळलेल्या वेदनेची
आठवण नाही जात मोहोरलेल्या दिवसांची
वेड्या मनाने ती कुठवर जपायची ?...

शिशिरातल्या पानगळीला
आठवत होती रात्र बहराची
आता मात्र ती शांत होती
हे आकाशही गप्प होते,
कदाचित त्यालाही आठवत असतील
चांदणीभरल्या स्वप्नांच्या उत्तररात्री...

□

## स्वप्नकेवडे

निळ्या जळात तू कोसळताना
लाट स्फटिकी मीच होते
रंगमण्यांचे किलबिल पडदे
किणकिण त्यांची मीच होते

मीच कोरले नाव तुझे ते
वळणावरच्या हिरव्या रानी
वेचताना मीच फुले ती
हात माखले चांदण्यांनीं

गर्द पिवळे शेत उन्हाचे
झूल केतकी मीच होते
शिखरांवरचे निवांत अंबर
मेघ रुपेरी मीच होते

मीच होते इथे तिथे अन्
अल्याडाच्या पार पलीकडे
कुठेच नव्हती तुझी सावली
फक्त होते स्वप्नकेवडे

□

## कळ्या

पिकल्या पानांच्या उदास विराण्या
ओठांवर गुणगुणत
पावसाळीं संध्याकाळ
माझ्या दाराशी पाय न वाजवता थांबली

तिच्या कातर स्वरांचे पक्षी
माझ्या मनाच्या फांद्यांवर
पानापानांत अलगद विसावले.
चुकार स्वरांच्या वेदनांनी
फुलांना जखमा केल्या

त्याच्या अश्रूंना कुशीत घेताना
दाराशी थांबलेल्या संध्येकडून
प्रकाशाची स्वप्ने
मागायचे राहूनच गेले

आता कदाचित सायंकाळ
माझ्या दारी यायची नाही
आणि आली, तर मलाच मागेल
पहाटेचे वरदान
काळोख्या रात्रीच्या गर्भात
उषेच्या कळ्या उमलत असतात
हे आता लक्षात राहत नाही...

□

## मारवा

दूरवरून वाऱ्यावर लहरत येणारे
मारव्याचे हे हळवे सूर...
मनावरून अलगद
मऊ मोरपीस फिरवून जातात

झाडांची निःशब्द सळसळ
रात्रीच्या त्या गाण्यात
जणू पानेही त्या नादब्रह्मात
स्वतःलाच हरवून जातात !

मारवा हळूहळू अंगात झिरपतो
त्याचेच अस्तित्व विसरून
व्यवहारी जगापासून दूर
काही काळ तरी
हे सूर असेच येत राहतील
पाकळ्यांचा गंध घेऊन
रातराणीवर चांदणं शिंपत
फुलांचे श्वास झेलीत
चंद्रमा हा माथ्यावर ढळेपर्यंत !

अखेर त्या सर्वांचाच
एक मारवा बनेल
आणि पौर्णिमेची ती प्रकाशरात्र
शोधत बसेल
अंत नसलेल्या स्वप्नांचा तळ !

□

## चाहूल

एक मुलगी हरवली आहे
तिच्या बरोबर तिच्या व्यथा,
तिचे शब्द आणि तिचीच गाणी आहेत.

कदाचित ती सापडेल
सध्याकाळच्या वाटेला
तिचंच एखादं गीत म्हणत
श्वासांच्या तालावर

किंवा कदाचित ती
उन्हाळ्याची वाट पाहत एखाद्या सावलीत
बसली असेल
कारण तिच्या सगळ्या जाणिवा थिजल्या आहेत
आणि उन्हाचा स्पर्श झाल्यावर त्या जाग्या
होतील,
असं ती म्हणत होती.

अशी मुलगी जर कुठं भेटली,
तर तिला एवढाच निरोप द्या, की
उन्हाळ्याची चाहूल लागायला लागलीय्
आणि कविता
तुझी केव्हाची वाट पाहतीय्...

□

## निंब

शहारला निंब
रिमझिम पावसात
झुलवले थेंब
मिटल्या पापण्यांत

फुलारला निंब
शुभ्रतेच्या पटलात
भिजलाही चिंब
घन मायेच्या वर्षेत

निथळला निंब
दाट पानांच्या डोळ्यांत
सावरला निंब
गच्च फांद्यांच्या हातांत

तृप्तलेला निंब
उभा असा अंगणात
तूही जरा थांब
माझ्या गोकुळी दारात. .

□

## अजून

अजून खिळते नजर
अंधारात विझलेल्या दिव्यावर
भग्नतेचे वृक्ष आता
दुरावलेल्या पाण्यावर

अजून खिळते नजर
काजळकाठी दिशांवर
विस्कटलेले क्षण आता
हरवलेल्या बांधावर

अजून खिळते नजर
ओल्या वाळूच्या किल्ल्यावर
ढासळलेले बुरूज आता
तटाच्या कोनाकोनांवर

अजून खिळते नजर
पडत्या घराच्या चौकटीवर
सावरायचे कसे आता
कोसळल्या मनाच्या तीरावर ?

□

## पक्षी

पांढऱ्या ढगावरून
चार काळे पक्षी उडत गेले
आणि मग पांढरे ढग काळे झाले
काळ्या ढगांतून पाऊस आला
काळ्या पक्ष्यांना भिजवून गेला.

मग...
काळ्या पक्ष्यांचे पांढरे अंतःकरण खुले झाले
– आणि पांढऱ्या ढगांना दुवा देत
ते क्षितिजाकडे उडत गेले.

□

## सळसळ

नव्हाळीतल्या तृणपात्यांची
ओळख पहिली अजून स्मरते
अवखळ त्यांच्या श्वासफुलांचे
पीस अजून अंगावर फिरते

निळ्या तळ्याचे अवखळ पाणी
तसेच लाजत पायी अडते
गच्च तांबडी गंधडहाळी
वाकून कुठल्या खुणा शोधते

अभ्र पांढरे स्तब्ध उभे अन्
दूर डोंगर काळे कबरे ते
क्षितिजावर त्या चोरपाऊली
शुक्र चांदणी हळुच उमलते

जुळून आली सगळी मैफल
गळ्यात विरले सूर निसटते
मात्र तुझ्याच त्या करपाशांची
सळसळ गहरी उरात सलते

□

## अनोळखी

ऊन भिजे पावसात
रंग पश्चिमी लेऊन
दूर पक्ष्यांच्याही रांगा
आल्या सावल्या होऊन

गर्द चिंचेचा घुमट
नाचे मोर पावलांत
किती फुलले फुलोरे
मावळत्या क्षितिजात

गच्च हिरव्या पानांत
माझे ओळखीचे रस्ते
शब्द कातरवेळेचे
रान मनात माजते

नवख्याच डोळ्यांनीही
सर्व काही न्याहाळले
नि अनोळखी होऊन
गाव दूरचे धरले

□

## विस्मरण

वाटेत कधी भेटावे अवचित
जुनें स्मित ओठी उमटावे
आभाळपंखांनी उडावे पक्षी
आश्चर्यात डोळे बुडवून घ्यावे

सहज आठवाव्यात सवयी
ओळखीचे झडावे कैक मुजरे
वाकलेल्या फांद्यांना व्हावे
घुमत्या वाऱ्याचे स्पर्श बोचरे

अनोळखी शब्दांचे वेड घेऊन
चार ओळी उगाच तुडवाव्या
इकडचे तिकडचे बरेच काही
मौन भाषा बोलक्या व्हाव्या

अशीच व्हावी भेट अचानक
न कळताच मग वाट फुटावी
काय बोलले, कधी न आठवे
विस्मरणाची मिठी पडावी

□

## उशीर

श्रावणरात्री जागवताना
पावसाने देखील साथ दिली
पारिजातकालाही
फुलं आता पेलवत नाहीत

केशरदेठांतून उमलणाऱ्या
त्या भावनांना
बांध कसा घालू ?

तू सुद्धा याच वेळी
चांदणं बनून
माझ्या रात्रींवर झिरपशील,
असं वाटलं नव्हतं

द्यायचेच होते उःशाप, तर
फार उशीर केलास
श्रावणधारांच्या थेंबांत
केव्हा बांधले गेले,
हे मला तरी कुठं कळलं ?

□

## पाऊसवेळा

पाऊसवेळा अवचित गाठुन
तुझी पाखरे दारी आली
मोतियांचे आभाळ नितळ
रानडोळा विखरुन गेली...

वेचण त्याची करता करता
मोहर पिवळे भरास आले
हातांनी या किती सावरू
अंगण माझे इवले इवले...

निळ्या गीतांचे बोल अनोखी
अंगोपांगी मिरवत गेले
जगावेगळी भेट तुझी ही
मनोमनी मी हरवत गेले...

पंख रेशमी बनात मिटता
गंध मातीचा परिचित आला
पाखरांना निरोप देता
पाऊस अवचित निघून गेला...

□

## निरोप

वठल्या फांद्यांवरी उलावी
कोकिळकंठी तान सावळी
तांबुस हिरवट पानफुलांना
जाग उठावी श्रावणवेळी...

मखमलीत कोंबांनी कवळे
हट्ट धरावे अन् देठांतून
काळ्या माती गहिरे व्हावे
शब्द फुटावे गवती मोहुन...

तृप्त सजावा असा वृक्ष तो
हिरवी लगबग डोळां व्हावी
पाचूंच्या मग स्वप्नलकेरी
उसळत यावी गर्द पालवी...

असे काहीतरी कधी घडावे
चाहुलीत त्या ऋतुराजाच्या
निरोप द्यावे शिशिरफुलांना
उन्हात पिवळ्या मावळतीच्या...

□

## नजर

लखडलेल्या आभाळाची
एक चांदणी माझ्यासाठी
मरव्याचीही धून बावरी
सरत्या श्रावण उत्तरराती...

मंद चांदणे ओघळलेले
झिरपून आले नसानसांतुन
पळवून नेले गीत फुलांनी
थरथरलेल्या स्वरतानेतुन...

वाट जराशी झाली तिरपी
आणि रुजली तिथेच वळणे
काठावर त्या खोल दरीच्या
रानफुलांचे पहाट फुलणे...

मोरमनाचा निळा फुलोरा
पाठ फिरवुनी बघतो टकमक
ठुमकत ठुमकत लाजलाजरी
जुई खिळवते नजर एकटक...

□

## अगतिक

कस्तुरीचे गंध
नादझुलत्या
थेंबमहालात
रेंगाळले सहजपणे
आणि पुनवेचं चांदणं
गात्रांत साठवताना
हिमवेदनेचे पाशही
अलगद निखळून पडले

मात्र दुरावलेली पर्वतराने
डोळ्यांत मिटवताना
तुझीच
प्रकर्षाने आठवण आली
आता पर्वतमाथ्यावर
थबकणाऱ्या
मावळतीला
माझे उष्टावलेले ओठ
कसे देऊ ?

□

## पाऊसमिठी

ती रखरखीत दुपारसुद्धा
तुझ्या अस्तित्वानं गंधावली
त्यातच निशिगंधी पानांचे
हिरवे मळे बहरलेले
तुझे गर्द गहिरे डोळे
तृषावलेले काठोकाठ...
त्या क्षणांची पाऊसमिठी
एक निमिषसुद्धा
उसवली नाही या देहापासून अजून
उलट ती अधिकच रुततीय्
तुझ्या आठवागणिक
आता तुझ्याच गीतभारल्या
श्वासाशिवाय
त्याची पकड सैलावणार नाही...

□

## चित्र

गवतफुलांच्या तांड्यांना
गाभुळ चिंचेचे डोहाळे
दोन पानांच्या झुल्यात
शुभ्र कळीचे हिंदोळे...

शहामृगाच्या पंखांनी
नादावले माळरान
गीत वासंती सुरांत
विसावले तरुपान...

उलगडल्या श्वासांचे
मखमली फुलोरे हे
टमटपत्या फुलांत
गंधमंजिऱ्यांचे दोहे...

इंद्रधनु क्षणांचे हे
तुझेच, रे, स्वप्नगान
भांबावल्या नेत्रांत
तुझे चित्र आरसपान...

□

## अर्थ

आषाढ-मेघांचे
किती श्रावण जपले
मत्तमयूर रानांचे
पंख धरेत बुडाले...

शेवग्याच्या फांदींतले
पान पान धास्तावले
गूढ सांज पिसारली
गंध हजार फुलले...

कर्दळीच्या गाभ्याला का
ऊन आभासी फुटले ?
पक्ष्यांच्याही आणाभाका
शब्द लपे पिकातले...

चांदकाळोखी काफिले
किती आकाशी चालले
नेत्रसुखद क्षणांचे
अर्थ आज हरवले...

□

## सवय

तुझे अवेळी फुलणे
आता सवयीचे झाले
कोसळत्या देहातही
राखाडरंगी धुमारे...

तुझा पाऊस कधीही
अंग अंग भिजवतो
फुलकुसुंबी ओठांनी
गात्रागात्रांना विणतो...

तुझ्या डोळ्यांच्या ओढ्याला
येतो उन्हाळ्यात पूर
झाले ओळखीचे तेही
किनारले माझे ऊर...

दिवसतोल नभांनी
नक्षत्रं कधी पेरली
तुझ्या फुलारत्या वेळी
लाल डाळिंबं फुटली...

□

## परीटघडी

सगळे रस्ते सरळच होते
कशास केली वाट वाकडी
पुन्हा कशाला खिन्न उसासे
आणि पखरण उदासवेडी...

उगीचच नंतर आढेवेढे
बहर फुलवुन स्वतःच रुसणे
डोळे उचलून पहात बसावे
हिमशिखरांचे उन्हात झुलणे...

पक्षी आले दूर देशींचे
पंख फुलवित निवांत ओले
वाटेवर मग थेंब सांडती
त्यांत उमटतील तुझी पाउले...

प्रवास आहे बराच हळवा
कशास केली वाट वाकडी ?
काही असेल जर विसरलेले
तशीच राहु दे परीटघडी...

□

## हुरहूर

गप्पांत रंगलेल्या
सावल्या पांगल्या
घरांच्या आपापल्या
खुणा आठवत
वाटावाटांत
अदृश्य झाल्या...

वृक्ष मात्र तिथले
हुरहुरत
पाहत राहिले
वाटेवर सावल्यांची
उमटलेली पाउले...

□

## शोध

चंद्र रात्रीत विझला
गाव कधी पहाटले
रित्या सागरी देहात
ऊर–पक्षी धपापले...

शब्द अजाण अबोल
गंध केवडी ऊतले
निळ्या आकाशवाटेत
काटे रुतून बसले...

कशी ओढ पावसाळी
दंग तुषारांत झाले
पायांखाली कधी माझ्या
रान हिरवे जळाले...

अंध प्रकाशाचे डोह
सुन्न क्षणांनी भिजले
नाद पावलांचे माझ्या
वाटा शोधीत निघाले...

□

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२४८९
दा. क्र. २४००२
काव्य १३।१०।८३
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

## पाकळी

तुझ्या आसवी पाण्यात
माझ्या ओठांचीं गाणी
कितीक भिजली
बकुळफुलांच्या
गुंफल्या माळेत
रात्र ही जपली
घनमयूर वृक्षांच्या
निळ्या पिसाऱ्यात
वाट, रे, सरली
अभ्र चांदणी नभात
तुझी अबोल पाकळी
कधी, रे, मिटली ?

□

## निंबोणी

निबझुलत्या पापण्यांत
माझ्या मनपक्ष्यांची
डहाळी घरटी
चिमण्या पंखांची
पानकिलबिल
उदास चोरटी
निळ्या पावसाचे
हिरवे फुलोरे
आभाळडोळ्यांत
वृक्षही मावेना
वाटेवर काळ्या
भिजऱ्या रानात
कुठे हरवले ते
निंबोण्यांचे सडे
पहाट केशरी
पेटत्या उन्हाचेही
स्वर किनारते
शांतल्या दुपारी...

□

## पंचमी

मेंदीरंगात उठले
किती आवर्त गंधांचे
रोमरोमांत उतले
किती उत्सव मनाचे...

पापण्यांत आली
थोडी चांदणीचाहूल
केशरनक्षीची
थोडी डोळ्यांतही भूल...

निळे आभाळ सांडले
शुभ्र पाऊस होऊन
वेल मातीत रुजली
क्षण फुलांचे घेऊन...

अस्पष्टशा रेषा
मग मेंदीत बुडाल्या
सण पंचमी सजून
माझ्या हातांवर आल्या...

□

## जाऊ नको दूर....

जाऊ नको दूर
आता तिन्हीसांजा झाल्या
अंधारले झाडपान
लाटा काळोखाच्या आल्या...

जाऊ नको दूर
गीत अर्धेच सोडून
स्वर निनादती मागे
बोल घुमती अजून...

जाऊ नको दूर
माझ्या रानच्या वाटेला
वारे भरारती दाट
शीण फांद्यांनाही आला...

जाऊ नको दूर
ओढ ठेव पावलांत
माझ्या डोळ्यांच्या चांदण्या
विझतील क्षितिजात

जाऊ नकोस तू दूर...

□

## जाग

गच्च भिजत भिजत
दूर रानवाटी जावे
ओल्या मातीत मातीत
पाय बुडवून घ्यावे...

थेंबभिजरा श्रावण
ओठी टिपूनच यावा
गीत लाजलेला घन
असा डोळ्यांतला प्यावा...

गंध उन्मत्त गडद
खोल पाण्यात उठावे...
धुंद पानवेली साद
पंख कोवळे उडावे...

तृप्त सजल वृक्षांनी
तान फुलांतून द्यावी
मन पिसांचे तरल
जाग दुपारीला यावी...

□

## मृग

पांगतील साऱ्या सरी
सय श्रावणी ठेवून
दाटतील डोळां अश्रू
लय पापणी लपून...

सरतील काळे घन
दूर क्षितिजाच्या वाटे
उमटेल चंद्रखूण
फिकटती झाडामागे...

मिटतील पहाटेला
थेंब सायलीच्या भाळी
रात्र उरेल एकटी
मिटवूनही पाकळी...

हिमवेदनी थंडीचे
मग पसरेल रान
तरी पावसाळी ओठी
माझ्या मृगाचेच गान...

□

## पाऊस

माझ्या मनात एक
आहे पाऊस भिजरा
घन श्रावणाचे येता
होतो ओठांत बावरा...

माझ्या मनात एक
आहे पाऊस भिजरा
दूर मयूरी रानात
होतो पंखांत नाचरा...

माझ्या मनात एक
आहे पाऊस भिजरा
गंध फुलांचे माळता
होतो पानांत लाजरा...

माझ्या मनात एक
आहे पाऊस भिजरा
तुझी आठवण येता
होतो डोळ्यांत साजरा...

□

## भास

भास तुझे दारातले
पावलांत गंधसडे
थेंब कसे भाळातले
डोळ्यांत या सांज अडे

परतीच्या प्रवासात
अनोळखी वाटचाली
दूरातल्या चांदण्यांच्या
ओठांतल्या हालचाली...

खिळलेले मौन तुझे
विझलेले स्पर्शरान
नाही, नाही म्हणताना
फुललेले चंद्रपान...

एकलेच स्वप्न असे
पंखांतल्या लहरींचे
नव्हतेच भास कधी
पानवेडचा त्या पक्ष्यांचे

□

## पंख

लख्ख दुपारीचे ऊन
गात्रागात्रांनी पिताना
तिन्हीसांजा दाट झाल्या
रान पिसाट होताना...

मावळले दाही तीर
फिरे दिशांत पाखरू
भास आभाळाचे आता
आले डोळयांत पसरू...

नीज चांदण्या करांची
पापणीची झूल त्यात
गंध केतकी पानांची
मिठी भुलवली आत...

नको, नकोस पेटवू
दिवे ओळखफुलांचे
मिटवले माझे मीच
पंख उजाड दिसांचे...

□

## सोबत

वाच माझ्या डोळयांतले
एका आभाळपक्ष्याचे गीत
अनवाणी स्वरांतून ओघळताना
– आणि
सुन्न शब्दांची गाथा
दुथडी भरून वाहू दे
रित्या रित्याशा घडयातून...

काठाकाठांचे कठोरपण
इवल्याशा चोचीतून सांभाळताना
बोलके खिन्न अंधार
उसळत येताना
आभाळपक्ष्याचे पंख
छाटले गेले.

राहू दे तसेच
रक्ताळलेले पंख
माझ्या अनाम वाटेसाठी
ओळखीचे दिवे बनून
वाट चुकलेच कधी काळी, तर
एका प्रवासी क्षणाची
सोबत, म्हणून...

□

## सांज

थोडी सांज उधळावी
दोन डोळ्यांच्या ओंजळी
पापणीला गाठ द्यावी
चंद्र मावळत्या वेळी...

सांज उधळावी अशी
कळू नये कुणालाही
साद जशी रानातली
उसवल्या दिशा दाही...

उधळल्या सांजेतली
थोडी गाणी तुला देते
गर्द हिरव्या काठाला
उरलेली रुजवते...

माझी सांज उधळून
देते अशी मी, रे, तुला
घे ना पापण्या भरून
श्वास माझा गंधओला...

□

## काहूर

केशरी स्वप्नांच्या
मोहरमिठीत
भिजून पहाट आली

पापणी–कडांना
घालून उखाणे
पाखरे निघून गेली

डोळ्यांत आकाश
जरा उतरून
तोलते चांदणीझूला
विझत्या चंद्राला
मोगरदवांनी
उत्सव कुणी बांधला ?

तुझ्याच रात्रीच्या
आवेग–स्पर्शांचे
आठव ओठांत खुळे
अल्लड रानांचे
काहूर घेऊन
जागले माझे, रे, डोळे...

☐

## आठवण

पाऊस हिरवा ओला
आर्त सतारीचे बोल
लागे आभाळाला झड
कळ उरातील खोल...

पाऊस हिरवा ओला
पाखरांच्या रानावर
फुलपंखांना फुटले
एक स्वप्न अनावर...

पाऊस हिरवा ओला
उन्हे तळ्यात बुडाली
जाईजुई पावलांना
जाग कशाची ही आली...?

पाऊस हिरवा ओला
तुझी अनामिक ओढ
पावसाच्या मिठीतून
तुझी आठवण गाढ...

□

## शांतता

वादळ इतकं जवळून गेलं
कोसळून अंगावरून
चाहूल लागलीच नाही थोडीसुद्धा

तुझे गप्प गप्प डोळे निथळले
नि अचानकच मग
जाग आली पापण्यांना
थोडसं आठवलंही, की
आषाढघनाची
निळी पाखरं
गेली होती खरी खुणावून
रिकाम्या खिडकीच्या आभाळातून...

छे ! !
पण वाटलंच नव्हतं
ही तळ्यातली शांतता
वादळापूर्वीचीच असेल, म्हणून...

□

## नकळत

हिरव्या हिरव्या लाटा
आणि लाटांमधली वळणे
दहा दिशांनी गात फिरावे
श्वासांमधले गाणे...

उन्हा–उन्हांनी मिटून जावे
मावळतीचे काठ
अंधाराच्या तालावरती
स्मरून जावे कुठले ओठ...

एक असावी खूण बावरी
डोळ्यांवरती वेडी
पापण्यांतुनी रुजून जावी
पाऊसभिजरी उनाड झाडी...

चिंब निथळता मेघ सावळा
रेशीमओठी गातो
ओठांवरती कुजबुज ऐकून
नकळत हसून जातो...

□

## डोळे

जेव्हा हरणांच्या करुण डोळ्यांतून
तुझीच गीतं वाचली
तेव्हा माझेही डोळे भरून आले
अचानकच...

निळा खोल समुद्र
असा उसळून येतो तुडुंब
थेट तुझ्या डोळ्यांसारखा
सगळीकडे तुझेच डोळे
अथांग पाण्याचे...

माझ्याच पापण्यांवरचे कोवळे दिवस
जरा उतरवून ठेवायला हवेत
म्हणजे तुझ्या डोळ्यांचे आकाश
मावळून जाईल
दूर अंधारात
हरणांच्या कळपात
पक्ष्यांच्या रानात
माझ्यापासून दूर, न दिसण्यासाठी
तुझे डोळे... माझे डोळे...

□

## वेडापिसा

थोडी ढळतीशी सांज
तृप्त हिरव्या पानांत
माझ्या चैत्राची चाहूल
गंध मोहरला गात...

डोळां दुपार कलली
सैल होऊन दारात
हळदील्या पावलांनी
ऊन मिटें आत आत...

जाग येते पहाटेला
गर्द वाऱ्याच्या पंखांनी
स्वप्न मिटे चांदण्यांचे
सोनसळचा क्षितिजांनी...

माझा उत्सवी दिवस
उजळतो असा असा
पापणीत वावरतो
जीव खुळा वेडापिसा...

□

## झुले

पाऊसनिथळत्या आभाळातही
तुझ्या ओठांच्या
निसटत्या खुणा

रेशीम–थेंबांच्या पानांतला पक्षी
हळू रुजवतो
ओला उखाणा

तुला आठवते अल्लड पावसाची
नाजूक सर
सोनेरी पंखांची

रात्रींनाच थोडे बहर आलेत
स्पर्शफुलांना
किनार गंधाची
नाही विसरता येणार क्षणांना

कातरवेळीं
फुलून आलेले
थरथर पाऊस आता उरात
बांधतो थोडे
तुझे माझे झुले...

□

## पापणी

डोंगरावरून हलकेच
एक एक पदर उलगडत
संध्याकाळ,
तळ्यातल्या स्तब्ध बगळ्याच्या
पंखांत मिटत जावी
आणि पाण्यावर अस्फुट तरंग
नकळत विरून जावेत
गवतफुलांना अलगद स्पर्शून :

—नि अशात तू आणि मी
मावळतीची लय पकडून
झुलत राहावे
नदीकिनारी दाटलेल्या
संध्याकाळीच्या
ताटव्या-ताटव्यांतून

कोरीव काजळकडांवर
तेवढीच एक पापणी
रंगून जाईल
मेंदीच्या गर्द गंधात...

□

## ओली खूण

एका उमजल्या क्षणी
काय झाले, कुठे, कसे ?
झाली दुपार हिरवी
लागे आभाळाला पिसे...

एका उधळल्या क्षणी
आले चांदणे झुकून
कसे तुला आता सांगू ?
चंद्र झिरपे आतून...

एका निवांतल्या क्षणी
माझ्या लाजऱ्या शब्दांत
तुझी ओळख बांधली
दोन चंदनी हातांत...

एका रात्रीतल्या क्षणी
तुझी दीर्घ आठवण
असा जातोस तू दूर
ओली ओठांतली खूण...

□

## सरत्या दिवसाकाठी

आला उनाड पाऊस
गेले भिजून गाव
सरत्या दिवसाकाठी
लागली कुणाची नाव...

ते आरसपानी डोळे
कलले उगाच पक्षी
दारातून वृक्षांसाठी
मी काढली थोडी नक्षी...

आभाळ–घनांची काया
मिटली पाण्यावरती
आल्या उलगडून का
श्रावण-भिजऱ्या राती...

सांडले नितळ थेंब
संध्येच्या शुभ्र ओठांत
गेला रुजून पाऊस
माझ्या अधीऱ्या गात्रांत...

□

२४८९
ग्रा. क्र. २४००२
काव्य ९३१.९०८
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)
REFBK-0024002
REFBK-0024002

## भैरवी

डोळ्यांच्या कडा अशा का पाणावल्या ?
भैरवीचे रंग उलगडताना
वाटलं, सगळं झुगारून द्यावं
आणि शोधत जावी
समेला मिळालेली तुझ्या डोळ्यांची दाद.

तो क्षण तिथेच संपला असता, तर
आज आयुष्यात रंगले असते
स्वरांचे आभाळ
– आणि निशिगंधाच्या फुलांनी
सजल्या असत्या सतारीच्या तारा...

पण हे घडायचं नव्हतं
आज सतार अशी एकाकी, अलिप्त
गवसणीत लपलेली
आता ती बोलायची नाही
आणि छेडलीच, तर
स्वर निघतील फक्त भैरवीचे
थेट तुझ्या आठवणींशी भिडणारे...

□

तुझी आठवण
माझ्या गीताच्या, रे, ओळी
सारवल्या अंगणात शुभ्र चांदणी रांगोळी

अशी स्वत:चीच ओळख करून देणारी तरल भावार्त काव्यात्मतेत सुस्नात झालेली ही कविता आहे. कवयित्रीचा अतीव तरल आणि संवेदनशील मनाचा प्रत्यय या कवितेच्या ओळीओळींतून येतो. दूरवरून येणारे मारव्याचे हळवे सूरही या मनावरून अलगद मोरपीस फिरवून जातात. ही कविता म्हणजे संध्याकाळच्या वाटेवर श्वासांच्या तालावर जिवंत हळवे गान म्हणणारी एक हरवलेली मुलगी. सृष्टी ही तिची सखी आहे. गर्द चिंचेचा घुमट शहारलेला, फुलारलेला निंब गवत फुलांना गाभुळ चिंचेत डोहाळलेल्या सगळ्याची तिला सोबत आहे आणि तिच्या मनात एक भिजरा पाऊस त्याच्या आठवणीत झिरपतो आहे. या मनाचा तरल हळुवारपणा असा वेडावलेला, की त्यातून आर्त साद घातली आहे. ' जाऊ नको दूर, आता तिन्हीसांजा झाल्या अंधारले वाटा काळोखत आल्या ही काव्यात्मता आणि हा या उत्कट सौंदर्यवेधी मनाचा अविभाज्य धर्म आहे. त्यातूनच या कवितांमधली चित्रमय प्रतिमासृष्टी मोहरली, बहरली आहे. केशरस्वप्नांच्या मोहरमिठीत भिजून आलेली पहाट म्हणजे तीच आहे. ओल्या चांदण्यांची, प्राजक्ताच्या केशरदेठांनी दाट तिन्हीसांजांनी भिजऱ्या पावसांनी ही प्रतिमासृष्टी बहरलेली आहे. आज दुर्मीळ झालेल्या सच्च्या भावकवितेसाठी रसिकाचे मन तहानलेले असते, तरल भावस्पंदनाची ही सौंदर्यवेधी, भावजीवी कविता रसिक मनात नवे आश्वासन निर्माण करते.

— अनुराधा पोतदार